| बीड-महाराष्ट्र | सोमवार दि.६ एप्रिल २०२६ | वर्ष ६ वे | अंक १८ | पाने ४ | पान १ | किंमत ३ रूपये




महाराष्ट्राचा बुलंद आवाज । दैनिक

# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे । मो. : 9822152955 E-mail : dailymarathwadapatra2021@gmail.com

| RNI/MAHMAR/2021/80074 | Post : Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-27 | https://marathwadapatra.com | https://epaper.marathwadapatra.com







## नाशिकमध्ये मुख्यमंत्री फडणवीसांची मोठी घोषणा

# भोंदूबाबा खरातच्या चौकशीसाठी आणखी एका तपास यंत्रणेची एन्ट्री!

नाशिक । वृत्तसेवा

भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणाचा तपास विविध यंत्रणेच्या माध्यमातून सुरु आहे. त्यामुळे दररोज नवे कारनामे समोर येत आहेत. या प्रकरणाची एसआयटीकडून चौकशी केली जात असल्याने त्याबाबत नवनवीन खुलासे होत आहेत. त्यातच आता नाशिक दौऱ्यावर असलेल्या सीएम फडणवीस यांनी मोठी घोषणा केली आहे. त्यामुळे भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणात आणखी एक तपास यंत्रणेची आता एंट्री होणार आहे. कोट्यवधींच्या संशयास्पद व्यवहार आता ईडीच्या रडारवर आले असून त्यामुळे अशोक खरातची ईडी चौकशी करण्याची घोषणा सीएम फडणवीस यांनी केली आहे.

## बड्या नेत्यांची नावे येणार समोर?

नाशिक येथील प्रसार माध्यमांशी संवाद साधताना सीएम फडणवीस यांनी पत्रकारांच्या विविध प्रश्नाची उत्तरे दिली. यावेळी त्यांनी अशोक खरात प्रकरणी विविध खुलासे केले आहेत. या प्रकरणात राजकारण करू नका असा सल्ला देतानाच त्यांनी अशोक खरात याचा सीडीआर कोणी लीक केला याचा तपास करणार असल्याचे स्पष्ट केले. खरातच्या घाणेरड्या कृत्याला पाठीशी घालणाऱ्यावर देखील कारवाई केली जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. पत्रकार परिषदेत ▶▶पान २ वर



केज-अंबाजोगाई रस्त्यावर

## तिहेरी अपघात

केज । प्रतिनिधी

केज येथील पिसेगाव फाट्याजवळ ५ मार्च रोजी दुपारी दोन कार आणि एसटी बसचा भीषण तिहेरी अपघात झाला. पेट्रोल पंपाकडे वळणाऱ्या एका अज्ञात वाहनामुळे पाठीमागील स्विफ्ट आणि रिट्झ कारने आपला वेग कमी केला होता. याच वेळी पाठीमागून येणाऱ्या भरधाव अंबाजोगाई-संभाजीनगर एसटी बसने या दोन्ही कारला जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात दत्ता लांडगे, विनोद जगताप आणि एसटी चालक मारुती फड हे तिन्ही चालक जखमी झाले आहेत. सुदैवाने, बसमधील १७ प्रवासी सुखरूप बचावल्याने मोठी जीवितहानी टळली असली तरी स्विफ्ट कारचा मात्र चेंदामेंदा झाला आहे. अपघातास कारणीभूत ठरलेला एक कार चालक घटनास्थळावरून फरार झाला असून जखमींवर स्थानिक रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

# ऊसतोड महिलांच्या अनावश्यक गर्भाशय शस्त्रक्रिया रोखण्यासाठी आ.मुंदडांचा पुढाकार

## पुण्यात राज्यस्तरीय समितीच्या बैठकीत केल्या महत्वपूर्ण शिफारशी

अंबाजोगाई। प्रतिनिधी

महाराष्ट्र विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलमताई गोरे यांच्या अध्यक्षतेखाली गर्भाशय काढून टाकण्याच्या शस्त्रक्रियांविषयी पुनर्गठित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय समितीची पहिली महत्त्वपूर्ण बैठक पुणे येथे ४ एप्रिल २०२६ रोजी पार पडली. या बैठकीत केज विधानसभा मतदारसंघाच्या आमदार नमिता मुंदडा यांनी उपस्थित राहून ऊसतोड महिला कामगारांच्या आरोग्याशी संबंधित अत्यंत गंभीर आणि संवेदनशील प्रश्नांकडे प्रशासनाचे लक्ष वेधले. राज्यातील ऊसतोड महिलांच्या अनावश्यक शस्त्रक्रियांवर नियंत्रण मिळवणे आणि त्यांना सुरक्षित आरोग्य सेवा पुरवण्यासाठी शासनाने तातडीने ठोस धोरण राबवावे, अशी आग्रही भूमिका मुंदडा यांनी यावेळी मांडली. ▶▶पान २ वर



# वाळू माफियांवर पोलिसांचा धडक कारवाईचा धडाका

## ३० लाखांचा हायवा जप्त

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यात सुरू असलेल्या वाळू घाटांच्या लिलावाच्या पार्श्व भूमीवरही अवैध वाळू उत्खनन आणि वाहतुकीचे प्रकार थांबण्याचे नाव घेत नसल्याचे चित्र दिसत असताना, चकलांबा पोलिसांनी पुन्हा एकदा मोठी धडक कारवाई करत वाळू माफियांना चांगलाच दणका दिला आहे. दिनांक ०२ एप्रिल २०२६ रोजी सकाळी सुमारे १०:४० वाजण्याच्या सुमारास गायकवाड जळगाव ते मालेगाव या कच्च्या रस्त्यावर पोलिसांनी गुप्त माहितीच्या आधारे सापळा रचत कारवाई केली. या वेळी अवैध वाळू वाहतूक करणारा भारत बेंझ कंपनीचा पिवळ्या रंगाचा हायवा (क्र. एम.एच. १४ जी.एच. ९१०८) ताब्यात घेण्यात आला. या हायवामध्ये अवैधरित्या वाळू भरलेली आढळून आली. जप्त करण्यात ▶▶पान २ वर

## १४ वर्षीय मुलीला फूस लावून पळविणारा आरोपी दीड महिन्यापासून फरार

# नातेवाईकांचे नेकनूर पोलीस स्टेशन समोर ठिय्या आंदोलन



बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील एका १४ वर्षीय अल्पवयीन मुलीला फूस लावून पळवून नेण्याच्या घटनेला दीड महिना उलटून गेला असून अद्याप आरोपी फरार आहे. या प्रकरणात मुलीच्या नातेवाईकांनी पोलिसांवर गंभीर आरोप केले आहेत. मुलीचे वडील नितीन बंकट माटकर (रा. कानडी घाट, ता. जि. बीड) यांनी दिलेल्या माहितीनुसार, त्यांच्या १४ वर्षीय मुलीला सूरज पंजाब झोडगे याने फूस लावून पळवून नेले. याबाबत नेकनूर पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मात्र, गुन्हा नोंद होऊन दीड महिना उलटूनही आरोपीला अटक करण्यात आलेली नाही. यामुळे संतप्त नातेवाईकांनी आरोप केला आहे की, नेकनूर पोलीस स्टेशनचे प्रभारी चंद्रकांत गोसावी व जमादार सचिन मुरूमकर हे आरोपीकडून पैसे घेऊन त्याला सहकार्य करत असून त्याला लपण्यासाठी मदत करत आहेत. या प्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांना तात्काळ हटवून निष्पक्ष चौकशी करावी व आरोपीला लवकरात लवकर अटक करावी, अशी मागणी नातेवाईकांनी केली आहे. यापूर्वीच ५ एप्रिलपासून नेकनूर पोलीस स्टेशनसमोर ठिय्या आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला होता. त्यानुसार आज आंदोलन करण्यात आले. मात्र पोलिसांनी आश्वासन दिले की, आरोपीच्या नातेवाईकांना बोलावून कसून चौकशी करण्यात येईल तसेच संशयित ठिकाणी पोलिस पथक पाठवून तपास केला जाईल. पोलिसांच्या या आश्वासनानंतर तात्पुरते आंदोलन मागे घेण्यात आले आहे. या वेळी मुलीचे नातेवाईक, वडील नितीन माटकर तसेच बाळासाहेब मोरे पाटील (संस्थापक अध्यक्ष, शिव शाहू ऊसतोड कामगार संघटना) यांच्यासह मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते

## महायुती सुनेत्रा पवारांच्या पाठीशी

# मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांचं विरोधकांना भावनिक आवाहन

मुंबई । वृत्तसेवा

राज्याचे दिवंगत माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे रिक्त झालेल्या बारामती विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीसाठी महायुतीकडून सुनेत्रा पवार यांना उमेदवारी देण्यात आली आहे. यासाठी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून सर्व पक्षांनी सुनेत्रा पवार यांना पाठिंबा देण्याचे आवाहन केले आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाणे येथे माध्यमांशी बोलताना सांगितले की, अशा परिस्थितीत महाराष्ट्रात पोटनिवडणुका बिनविरोध करण्याची परंपरा राहिली आहे. महायुती सुनेत्रा पवार यांच्या पाठीशी ठामपणे उभी असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागपूर येथे पत्रकारांशी संवाद साधताना याच भावनेतून सर्व पक्षांनी सकारात्मक विचार करावा, असे आवाहन केले. महाविकास आघाडीतील मित्रपक्ष असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट) बारामती पोटनिवडणूक लढवणार नसेल तर काँग्रेस ▶▶पान २ वर



## तलवाडा येथील अनेक दिवसापासून

# नादुरुस्त असलेले फिल्टर दुरुस्त



तलवाडा । प्रतिनिधी

### नागरिकांना मिळणार अल्पदरात शुद्ध व थंड पाणी

तलवाडा हे गाव गेवराई तालुक्यातील सर्वात मोठे गाव तशा समस्या ही असतात स्वच्छ्ता, वीज, आरोग्य, पाणी अशा समस्या नेहमीच नागरिकांना भेडसावत असतात तसे उन्हाळा लागला की, पाणी प्रश्न निर्माण होतात परंतु या वर्षी ग्राम पंचायत चया योग्य नियोजनामुळे नेहमीपेक्षा वापराचे पाणी मुबलक असल्याने नागरिकांना समाधान आहे. परंतु स्वच्छ फिल्टर पाणी (ठज) तलवाडा येथील नागरिकांना मिळणं तितकंच आवश्यक आहे ही बाब लक्षात घेता ग्रामसेवक मुसळे यांनी प्रश्न मार्गी लावण्याचा ध्यास घेतला. तलवाडा ग्राम पंचायत मार्फत गणेशनगर(पाण्याच्या टाकी जवळ),कानेश्वर चौक व नव्याने बसवलेले अंबिकानगर देवीच्या मंदिराजवळ असे तीन ठिकाणी फिल्टर बसवलेले आहे. यामध्ये ऐन गावातील मोठ्या लोक वस्तीतील गणेशनगर व कानेश्र्वर ▶▶पान २ वर

# प्रशासनातही तुकाराम वाळीतच!

भारतीय संत परंपरेत संत तुकाराम यांना त्यांच्या विचारांसाठी, प्रामाणिकपणासाठी आणि समाजजागृतीसाठी मोठा त्रास सहन करावा लागला. आजच्या काळात प्रशासनातही तसाच एक संदर्भ दिसून येतो. तो म्हणजे तुकाराम मुंडे यांचा. दोघांमध्ये काळाचा मोठा फरक असला, तरी प्रामाणिकतेची किंमत मात्र दोघांनीही चुकवली आहे. तुकाराम मुंडे यांचे नाव घेतले की लगेच एक समीकरण डोळ्यासमोर येते. मुंडे = बदली. गेल्या २० वर्षांच्या कारकिर्दीत तुकाराम मुंडेंच्या २४ बदल्या झाल्या आहेत. सोलापूर, नाशिक, पुणे पीएमपीएल, नवी मुंबई, नागपूर, राज्य मानवाधिकार आयोग, दिव्यांग विभाग यानंतर त्यांना आता आपत्ती व्यवस्थापन विभागात पाठवले आहे.अशा सततच्या बदल्यांचा त्यांचा प्रवास केवळ प्रशासकीय नाही, तर व्यवस्थेच्या मानसिकतेचे प्रतीक आहे. एखादा अधिकारी कडक स्वभावाचा, शिस्तप्रिय आणि नियमांशी तडजोड न करणारा असेल, तर तो सत्ताधाऱ्यांच्या दृष्टीने अडचणीचा ठरतो, हे वास्तव आहे. नागपुरातही आयुक्त असताना नितीन गडकरींनी स्वतः मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंना विनंती करून तिथे चांगलं काम करणाऱ्या मुंडेंची बदली करण्यात आली. मुंडे यांच्या कारकिर्दीकडे पाहिले, तर एक गोष्ट स्पष्ट दिसते ती म्हणजे ते बेकायदेशीर कामांना ठाम नकार देतात. भ्रष्टाचार, अनियमितता किंवा राजकीय दबाव यांना झुकत नाहीत. पण याच गोष्टी त्यांच्या विरोधात वापरल्या जातात. त्यांच्या बद्दल राजकारण्यांकडून एक खोटा नॅरेटिव्ह उभा करण्यात आला आहे.ते काम करत नाहीत, ते नेहमी नियमांवर बोट ठेवतात, जिथे जातील तिथे विरोध निर्माण होतो. प्रत्यक्षात, ही त्यांची कमजोरी नसून त्यांची ताकद आहे.कारण ते बेकायदेशीर कामे करत नाहीत. भ्रष्ट कारभार खपवून घेत नाहीत.पण जनसामान्यांची वैध कामे करण्यात तुकाराम मुंडे कधीच कसर सोडत नाहीत.तुकाराम मुंडेना विरोध का होतो? कारण तुकाराम मुंडे कधीच जिथं सही कर म्हटलं तिथं डोळे झाकून सही करत नाहीत. प्रशासनात सत्तेला नेहमी मर्जीतले अधिकारी हवे असतात. जे प्रश्न विचारणार नाहीत, आदेश पाळतील, आणि आवश्यक तेव्हा नियमांना वाकवतील. अशा व्यवस्थेत मुंडे यांसारखा अधिकारी अस्वस्थता निर्माण करतो. कारण तो केवळ नियमांची अंमलबजावणी करत नाही, तर तो सत्तेच्या सोयीस्कर चौकटीलाही आव्हान देतो. हा प्रश्न केवळ एका अधिकाऱ्याचा नाही. हा प्रश्न आहे आपण कोणत्या प्रकारच्या प्रशासनाला प्राधान्य देतो? प्रामाणिक, कडक आणि पारदर्शक प्रशासन की सोयीस्कर, तडजोडीचे आणि राजकीय दबावाखाली काम करणारे? काल तुकाराम मुंडेंची दिव्यांग विभागातून बदली करण्यात आली.दिव्यांग विभागात त्यांनी घेतलेल्या ठोस निर्णयामुळे अनेक फेक अपंगांना घरी बसावे लागले.ज्या दिव्यांग संस्था कालपर्यंत दिव्यांगाच्या नावाने सरकारी पैसे उकळत होत्या त्यांना तुकाराम मुंडेंनी चाप लावला. अपंग कोट्यातून नोकऱ्या घेतलेल्या प्रत्येकाला आपले प्रमाणपत्र व्हेरिफाय करून घेण्यासाठी अद्यावत वेबसाईट



बनवली.इथेच माशी शिंकली. कनिष्ठ स्तरावरील ८०० अधिकाऱ्यांच्या नोकऱ्या गेल्यावर वरिष्ठ स्तरावरही खोटी प्रमाणपत्रे घेऊन नोकरी मिळवलेल्या लॉबीला तुकाराम मुंडे दिव्यांग विभागात सचिव म्हणून नको होते. मुंडेंनी व्हिडिओ ऑडिटचा नवीन पायंडा पाडल्याने फक्त कागदावर असलेल्या दिव्यांग शाळा, संस्था, सेवाभावी संस्था यांचेही धाबे दणाणले होते.त्यामुळे वरिष्ठ स्तरावर मुंडेंच्या बदलीसाठी प्रयत्न करण्यात आले. नागपूरमधील भाजपचे आमदार खोपडेंनी त्यांच्या विरोधात विधानसभेत मोर्चा उघडला.पण तेव्हा मुंडेंच्या बाजूने असलेल्या मुख्यमंत्र्यांनी आता मात्र तुकाराम मुंडेंची बदली केलीच. पण बदली करताना हि विशेष काळजी घेतली गेली की, मुंडे मंत्र्यांना त्रासदायक ठरणार नाहीत.त्यांना सचिव आपत्ती व्यवस्थापन - महसूल आणि वने या विभागात कारकुनी कामासाठी पाठवण्यात आले आहे.एवढा प्रामाणिक आणि धडाडीचा अधिकारी साईड पोस्टिंगवर फेकण्यात आला. मुंडे तिथेही आपल्या कामाचा धडाका सुरूच ठेवतील पण देवेंद्र फडणवीस यांच्यासारखा पारदर्शक मुख्यमंत्री तुकाराम मुंडेंसारख्या पारदर्शक आणि स्वच्छ अधिकाऱ्यांना वाळीत टाकून होयबा करणारे अधिकारीच जवळ करतो याचे आश्चर्य वाटले.तुकाराम मुंडेनी ठरवले असते तर आपल्या पदाचा वापर करून राजकारणात एखादा गॉडफादर हाताशी धरून माया जमवली असती पण तत्वांशी तडजोड करणार नाही, वेळ पडली तर गावी जाऊन शेती करण्याची तयारी मुंडेंची असल्यामुळे तुकाराम मुंडे कधीच कुणाचे पाईक झाले नाहीत. संत तुकारामांनी त्यांच्या अभंगांतून सत्य मांडले, त्यामुळे त्यांना वाळीत टाकले गेले. आज तुकाराम मुंडे यांच्याबाबतही काहीसे तसेच घडताना दिसते. इतिहास स्वतःची पुनरावृत्ती करत आहे का, हा प्रश्न उपस्थित होतो. शेवटी, एखाद्या अधिकाऱ्याची बदली ही केवळ प्रशासकीय प्रक्रिया नसते, ती व्यवस्थेच्या मूल्यांची परीक्षा असते. आणि या परीक्षेत आपण वारंवार अपयशी ठरत आहोत, असे चित्र निर्माण झाले आहे. प्रामाणिकपणा हा दोष ठरू लागला, तर ती केवळ एका अधिकाऱ्याची नव्हे, तर संपूर्ण व्यवस्थेची शोकांतिका ठरते.

## तुकाराम मुंढेंचं आदर्शवत पाऊल, रुढींना फाटा

# आईच्या अस्थींचे शेतातच विसर्जन; वडाचं रोपटं लावून जपली आठवण

**बीड** । प्रतिनिधी

दिव्यांग कल्याण विभागाचे माजी सचिव तथा आय. ए. एस अधिकारी तुकाराम मुंढे यांच्या आई आसराबाई यांचे वयाच्या ९० व्या वर्षी निधन झाले. स्वत: तुकाराम मुंढेंनी आईच्या आठवणी जागवत याबाबत माहिती दिली होती. बीड जिल्ह्यातील त्यांच्या ताडसोना या मूळगावी आसराबाई यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. आईचे निधन झाले तेव्हा तुकाराम मुंडे प. बंगालमध्ये सेवेत होते, तेथून ते पुण्याला आले, नंतर आपल्या मूळगावी गेले. आपल्या आईच्या निधनानंतर तुकाराम मुंढे यांच्यातला भावनिक माणूस महाराष्ट्राने पाहिला, बंधूंच्या गळ्यात पडून ते रडताना सर्वजण भावुक झाले होते. मातोश्रींच्या पार्थिवावर अत्यंसस्कार झाल्यानंतरही तुकाराम मुंढे यांच्यातला सामाजिक जावीण जपणारा माणूस दिसून आला. पारदर्शक कारभार, शिस्तप्रिय प्रशासन काटेकोर नियमांचे पालन करून निर्णय आणि अनियमितता खपवून न घेणारे अशी तुकाराम मुंडे यांची महाराष्ट्राला ओळख आहे. आईच्या मृत्यूनंतर तुकाराम मुंढे यांच्या व्यक्तिगत आयुष्यातही त्यांनी एक आदर्श उदाहरण दाखवून दिले आहे. अंत्यविधी झाल्यावर कसल्याही अनावश्यक प्रथा परंपरा रूढींना बाजूला ठेवत त्यांनी दुसऱ्याच दिवशी त्यांच्या आईच्या अस्थींचे विसर्जन केले. विशेष म्हणजे १० दिवसांची वाट न पाहता आणि कुठल्याही नदीतरी न जाता वेगळ्या पद्धतीने त्यांनी आईंच्या अस्थींचे विसर्जन केले. आपल्या शेतातील घरासमोर एक खड्डा खांदून त्यात आईच्या अस्थिविसर्जत करत त्यावर एक वडाचे रोपटे लावण्यात आले आहे. यावेळी, स्वत: त्यांनी ते रोपटे घेऊन, खड्डा खांदून, माती ओतून ते रोपटे लावले. तुकाराम मुंढेंनी अस्थि विसर्जनापासून पुढे होणाऱ्या कर्मकांडांच्या विधींना फाटा दिल्याचे दिसून आले, या घटनेचे फोटो आणि व्हिडिओ समाजमाध्यमांवर व्हायरल झाले असून त्यांच्या या कृतीचं कौतुक होत आहे.



## वाढदिवस साजरा करण्यातील विकृती!



वाढदिवस साजरे करताना कापलेला केक ज्याचा वाढदिवस आहे त्याच्यासह एकमेकांच्या तोंडाला फासण्याची विकृत प्रथा गेल्या काही वर्षांत सर्वत्र रूढ होत चालली आहे. आजमितीला भारतातील एक मोठा वर्ग दारिद्र्य रेषेखाली जीवन कंठत आहे. ज्यांच्या नशिबी एकवेळचे जेवण मिळणेही कठीण असते. त्याची काडीचीही जाण नसलेली मंडळी शेकडो रुपये खर्च करून आणलेला केक परस्परांची तोंडे रंगवण्यात वाया घालवत असतात. विज्ञानामुळे जग जसे जवळ आले तशा जगातील वाईट गोष्टीही देशात रुळल्या. हल्लीच्या पिढीवर पाश्चिमात्त्य संस्कृतीचा मोठा प्रभाव असलेला पाहायला मिळतो. वाढदिवशी जागी होणारी ही विकृतीही त्याचाच एक भाग आहे. वाढदिवस कसा साजरा करावा याविषयीचे सर्वांगसुंदर ज्ञान आपल्या ऋषी मुनींनी जगाला दिले आहे; मात्र इंटरनेटच्या युगात वावरणाऱ्या आजच्या पिढीला त्याचा मागमूसही नाही. हिंदू धर्मानुसार वाढदिवसाच्या दिवशी दिवे विझवायचे नसतात, तर एक नवीन दिवा लावून पुढील जीवन तेजोमय करण्याचा संकल्प करावा. ज्याचा वाढदिवस आहे त्याचे औक्षण करावे. या दिवशी जेष्ठ मंडळी, नातेवाईक यांचा आशीर्वाद घ्यावा आणि समवयस्कांच्या शुभेच्छा घ्याव्यात. या दिवशी भेटवस्तू स्वीकारायच्या नसतात तर दानधर्म करायचा असतो. वाढदिवसाच्या शुभेच्छा सुद्धा सूर्योदयानंतरच द्याव्यात. ज्याचा वाढदिवस आहे त्याचे येणारे जीवन आनंदमय, भरभराटीचे आणि निरोगी जावे हा उदात्त हेतू यामागे दडलेला आहे. याउलट मध्यरात्री १२ वाजता दिवे विझवून, केकवर सूरी फिरवून, केकने एकमेकांची तोंडे रंगवून आणि मद्याचे पेले रिझवुन आपण कोणत्या आयुष्याची सुरुवात करत आहोत याचा विचार आजची तरुण पिढी करणार आहे का ?

**सौ.मोक्षदा घाणेकर, काळाचौकी, मुंबई**

## पान १ वरून

### भोंदूबाबा खरातच्या...

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, भोंदू अशोक खरात प्रकरणाची सखोल चौकशी केली जाणार आहे. त्याच्या सर्व व्यवहारांची चौकशी केली जाणार आहे. अशोक खरात प्रकरणात आतापर्यंत १२ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या प्रकरणी एसआयटी तपास सुरू असून तो रोजच्या रोज जाहीर करता येणार नाही. दरम्यान, ईडीने या प्रकरणाची संपूर्ण माहिती घेतली आहे. त्यामुळे त्याची ईडी चौकशी केली जाणार आहे. सीडीआर प्राप्त करून घेण्याचा अधिकार कुणाला नाही. जे या प्रकरणाचा तपास करत आहेत, अशा तपास यंत्रणांनाच तो सीडीआर मिळवण्याचा अधिकार आहे. त्यामुळे या प्रकरणाचा सीडीआर कसा बाहेर आला, तो कुठून मिळवला याची चौकशी केली जाणार आहे. अशोक खरात प्रकरणात ज्यांचा ज्यांचा सहभाग आहे. त्यांच्यावर कारवाई केली जाणार आहे. कणालाही सोडणार नाही. त्यासोबतच अंजली दमानियांकडे खरातचा सीडीआर कशा प्रकारे आला याची चौकशी करणार असल्याचे फडणवीस यांनी स्पष्ट केले. * खरातचा पाय आणखी खोलात.... सीएम फडणवीस यांनी केलेल्या ईडी चौकशीच्या घोषणेने भोंदू बाबा अशोक खरातचा पाय आणखी खोलात गेला आहे. अनेकांना घाम फोडणारी आणि त्रस्त करणाऱ्या ईडीचा, सक्तवसुली संचालनालयाचा ससेमिरा आता खरातच्या मागे लागण्याची शक्यता आहे. तर त्याचवेळी अनेक संशयास्पद कोट्यवधीचे व्यवहार रडारवर आले आहेत. हे व्यवहार नेमके कुणाचे आहेत. या व्यवहारात कोण कोण आहेत, याची इत्यंभूत माहिती समोर येणार आहे. त्यामुळे अनेकांची धाबे दणाणली आहेत.

### ऊसतोड महिलांच्या...

बैठकीदरम्यान ऊसतोड महिलांच्या आरोग्याचे संरक्षण, अनावश्यक शस्त्रक्रियांवर कडक नियंत्रण आणि ग्रामीण भागातील महिलांना योग्य वैद्यकीय मार्गदर्शन मिळवून देण्यासाठी व्यापक जनजागृती करण्याबाबत सखोल चर्चा करण्यात आली. आमदार नमिता मुंदडा यांनी यावेळी स्पष्ट केले की, महिलांचे आरोग्य ही केवळ त्यांची वैयक्तिक जबाबदारी नसून ती संपूर्ण समाजाच्या सर्वांगीण विकासाशी निगडित आहे. प्रत्येक महिलेला सुरक्षित, सन्मानपूर्वक आणि आरोग्यदायी जीवन मिळणे हा त्यांचा हक्क असून, त्यासाठी शासनाने सकारात्मक पावले उचलणे काळाची गरज आहे. या विषयावर प्रभावी धोरण तयार करण्यासाठी काही महत्त्वपूर्ण शिफारशीही समितीमार्फत शासनाला सादर करण्यात आल्या आहेत. या विशेष बैठकीसाठी अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे तज्ज्ञ, बीड जिल्हा रुग्णालयाचे अधिकारी आणि इतर मान्यवर उपस्थित होते. विशेषतः बीड जिल्ह्यातील ऊसतोड महिलांच्या शस्त्रक्रियांच्या प्रश्नावर यापूर्वीही मोठे वादंग निर्माण झाले होते, त्या पार्श्वभूमीवर या समितीची बैठक आणि मुंदडा यांनी मांडलेली भूमिका अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे. महिलांच्या आरोग्याबाबत कोणत्याही प्रकारची तडजोड केली जाऊ नये आणि त्यांना स्थानिक पातळीवरच दर्जेदार आरोग्य सुविधा मिळाव्यात, यासाठी या बैठकीत ठोस आराखडा तयार करण्यावर भर देण्यात आला.

### नादुरूत असलेले...

चौक येथील फिल्टर मागील अनेक महिन्यापासून दुरुस्ती अभावी बंद अवस्थेत होते यामुळे या वर्षी तापमान हे नेहमी पेक्षा जास्त असल्याने थंड पाण्यासाठी तलवाडा नागरिकांना वण - वण फिरावे लागत होते तर खाजगी पाणी विक्रेत्या कडून जास्तीचे पैसे मोजून आपली तहान भागवावी लागत होती.तर अनेक नागरिक, गोर गरीब कुटुंब रोज विकत पिण्याचे पाणी घेऊ शकत नसल्याने नळाचे पाणी तसेच इतर विहिरी,हातपंप अशा ठिकाणाहून अस्वच्छ( पिण्यास अयोग्य असलेले) पाणी पिण्यास वापरत आहेत या मुळे महिला,पुरुष,लहान मुले, यांचे आरोग्य धोक्यात येऊन अनेक आजारांना निमंत्रण देण्यासारखे आहे त्यामुळे तलवाडा येथील ग्राम विस्तार अधिकारी श्री.सोपान मुसळे यांनी नागरिकांच्या समस्या लक्षात घेता तात्काळ मागील अनेक दिवसापासून नादुरुस्त असलेले पाणी फिल्टर दुरुस्त करून अल्पदरात म्हणजे ५ रू. मध्ये २० लिटर पाणी देऊन तलवाडा करांची तहान शुद्ध व थंड पाणी देऊन तहान भागवली आहे. यामुळे तलवाडा येथील जनतेकडून प्रशासक श्री. चोपडे साहेब व ग्राम विस्तार अधिकारी श्री सोपान मुसळे साहेब यांचे अभिनंदन होत आहे.

### मुख्यमंत्री आणि ...

महायुतीच्या विरोधात उमेदवार देणार असल्याचे यापूर्वीच स्पष्ट करण्यात आले आहे. याबाबत दिल्लीतील नेत्यांची देखील परवानगी मिळाल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे बारामतीमधून काँग्रेसकडून उमेदवार निश्चित करण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात पोहोचली आहे. एकीकडे काँग्रेसने निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतल्याचे स्पष्ट केले असताना दुसरीकडे ओबीसी आंदोलक लक्ष्मण हाके यांनी देखील आपण उमेदवारी अर्ज दाखल करणार असल्याचे सांगितले आहे. ते उद्या उमेदवारी अर्ज दाखल करणार असून विविध राजकीय पक्षांचा पाठिंबा असल्याचा दावा त्यांनी केला आहे. दरम्यान आता ही पोटनिवडणूक कोणते नवे वळण घेणार हे पाहणं महत्त्वाचं ठरेल.

### वाळू माफियांवर...

आलेल्या वाहनाची किंमत अंदाजे ३० लाख असून, त्यामधील वाळूची किंमत सुमारे ३० हजार आहे. अशा प्रकारे एकूण ३० लाख ३० हजारांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे. या प्रकरणी गोकुळ राजेंद्र रोकडे (वय २६, रा. अर्धापुरी, ता. गेवराई, जि. बीड) याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला असून, त्याने कोणताही अधिकृत परवाना नसताना स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी अवैध वाळू वाहतूक केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. या संदर्भात चकलांबा पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ९९/२०२६ नोंदविण्यात आला असून, भारतीय न्याय संहिता कलम ३०३ (२), ३(५) अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल कटके यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि सचिन इंगळे, पोलीस कर्मचारी घोंगडे, थापडे, इंगोले यांनी केली असून पुढील तपास पोलीस नाईक गुजर करत आहेत. विशेष म्हणजे, सपोनि सचिन इंगळे यांनी चकलांबा पोलीस ठाण्याचा पदभार स्वीकारल्यानंतर अवैध धंद्यावर कारवायाचा धडाका लावला असून तीन आठवड्यांत ही तिसरी मोठी कारवाई आहे, त्यांच्या धडाकेबाज कामगिरीची चर्चा परिसरात सुरू असून अवैध धंदेवाल्याचे धाबे दणाणले आहेत.




Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# जय भीम महोत्सव: जिल्हास्तरीय सामान्य ज्ञान स्पर्धा परीक्षा उत्साहात संपन्न!

## विद्यार्थ्यांनी आपले ध्येय उच्च ठेवावे : उपशिक्षणाधिकारी नानाभाऊ हजारे

**बीड । प्रतिनिधी**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्ताने महापुरुष जिल्हास्तरीय सामान्य ज्ञान स्पर्धा चे आयोजन बीड शहरातील तुलशी संगणक महाविद्यालय येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या वतीने करण्यात आले होते . दर सालाबादप्रमाणे या ही वर्षी समितीच्या वतीने जिल्हास्तरीय सामान्य ज्ञान स्पर्धा आयोजित करण्यात आले .या स्पर्धेच्या तालुकास्तरीय स्पर्धेतून निवडक प्रथम दहा विद्यार्थ्यांची निवड केली होती .बीड जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातील विद्यार्थ्यांनी याच्यात सहभाग घेतला. बीड जिल्ह्यातून एकूण या परीक्षेसाठी सातशे विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला त्यापैकी जिल्हास्तरीय साठी





११० विद्यार्थी पात्रता धारक होते . सदर परीक्षा सुरू करण्यापूर्वी कार्यक्रमाचे उद्धाटन बीड जिल्हा परिषदेचे उपशिक्षणाधिकारी माध्यमिक विभाग आयु. नानाभाऊ हजारे यांच्या हस्ते संपन्न झाले. या कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी मध्ये विचार मंचावर प्रवीणकुमार तरकसे मुप्टचे जिल्हाध्यक्ष (माध्यमिक विभाग), कल्याण भंडारे (सेवानिवृत्त पीएसआय ),समितीचे मा. अशोक ठोकळ साहेब (सेवानिवृत्त एएसआय ), जिल्हा स्पर्धा समिती प्रमुख प्रा. शशिकांत जावळे , जयंती उत्सव समितीचे प्रमुख मनोज वाघमारे , सुमेध जोगदंड सर,बबन पंडित सर, युवा मल्हार सेनेच्या जिल्हाध्यक्ष प्रा. रेखा निर्मळ, शिंदे साहेब आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

सदर कार्यक्रमाची सुरुवात महापुरुषांच्या प्रतिमेंना अभिवादन करून करण्यात आली. विद्यार्थ्यांनी आपली वाचन संस्कृती वाढवावी व चिकित्सक वृत्ती वाढवावी. या हेतूने आपले वर्तन असले पाहिजे.त्यासाठी आपले ध्येय हे उच्च असले पाहिजे .विद्यार्थ्यांना बारावीनंतर इतर स्कॉलरशिप द्वारे परदेशात शिक्षण घेण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळावी याकरता प्रयत्नशील राहील अशी ग्वाही नानाभाऊ हजारे यांनी आपल्या उद्घाटन पर भाषणात दिली. प्रमुख अतिथी प्रवीण तरकसे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले पुस्तक हे मस्तक घडविण्याचे काम करते. 'वाचेल तोच वाचेल' हा मोलाचा संदेश त्यांनी आपल्या मनोगतातून दिला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा स्पर्धा समिती प्रमुख प्राध्यापक शशिकांत जावळे यांनी केले त्यांनी आपल्या प्रास्ताविकामध्ये स्पर्धेचा अनुभव व आढावा थोडक्यात दिला. सामान्य ज्ञान स्पर्धा परीक्षा ही जिल्ह्यामध्ये एक व्यापक वाचन संस्कृती चळवळ व्हावी असे मत व्यक्त केले. सदर परीक्षेसाठी जिल्हाभरातून एकूण ७० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला त्यातून, प्रथम क्रमांकाचे पारितोषिक कु. कार्तिकी नंदू अनाप (एकलव्य विद्यालय शिरूर कासार,) द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक विभागून दोन विद्यार्थ्यांना देण्यात आले. कु. भार्गवी कैलास तुपे (एकलव्य विद्यालय शिरूर कासार )व कु. वैष्णवी संदीप थोरात (कालिका देवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय शिरूर कासार ) तर तिसरे पारितोषिक ही विभागून देण्यात आली यामध्ये स्वरा लक्ष्मीकांत भांडेकर ( न्यू स्वामी समर्थ इंग्लिश स्कूल शिरूर) व यश राजकुमार जावळे (जवाहर नवोदय विद्यालय टा.ढो.) सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे उपशिक्षणाधिकारी नानाभाऊ यांच्या हस्ते अभिनंदन करण्यात आली. सदर परीक्षेचे कामकाज प्रा.प्रशांत मळेकर यांच्या नियोजनाखाली प्रा. सुनील मोरे प्रा.अनिल जरे, प्रा. नारायण घोलप ,प्रा. अशोक सवासे, आप्पासाहेब कांबळे, जितेश उगलमुगले आदींनी केले. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीचे प्रमुख मनोज वाघमारे, सुमेध जोगदंड, मा.अशोक ठोकळ, प्रणित सरवदे, ड राजेश शिंदे, किरण निसर्गंध , प्रा. नारायण घोलप, प्रा. प्रकाश ढोकणे ,पि.डी. जावळे ,निलेश तरकसे , चंद्रकांत साळवे, प्रा. प्रकाश ढोकणे आदींनी परिश्रम घेतले. तसेच सामान्य ज्ञान स्पर्धेसाठी बक्षीस वाढविण्याची विनंती जिल्हा स्पर्धा समिती प्रमुख प्रा. शशिकांत जावळे यांनी केली त्यावर माननीय उपशिक्षणाधिकारी नानाभाऊ हजारे यांनी पुढील वर्षीपासून बक्षीस माझ्या वतीने २५ हजार रुपये व प्रथम तीन गटामधून येणारे ९ विद्यार्थ्यांना ऐतिहासिक स्थळाची भेट सहल देण्याचे त्यांनी जाहीर केले. कार्यक्रमा दरम्यान पूज्य भदंत विपश्यनाचार्य विनयरकीता महाथेरो व पूज्य भिकू धम्मशील यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन महादेव इनकर सर तर प्रास्ताविक जिल्हा स्पर्धा समिती प्रमुख प्रा. शशिकांत जावळे यांनी केले. तर आभार प्रदर्शन प्रा.नारायण घोलप यांनी केले. कार्यक्रमासाठी विद्यार्थी, पालक, शिक्षक ,पत्रकार यांची बहुसंख्येने उपस्थित होते.

# मनोज शिंदे यांची बाजीराव चव्हाण यांच्या जनसंपर्क कार्यालयास सदिच्छा भेट ; उत्साहात स्वागत

### उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली मनोज शिंदे यांचे स्वागत

**बीड । प्रतिनिधी**

शिवसेना बीड लोकसभा संपर्कप्रमुख श्री. मनोज शिंदे साहेब यांनी युवासेना मराठवाडा निरीक्षक बाजीराव चव्हाण यांच्या जनसंपर्क कार्यालयास सदिच्छा भेट दिली. त्यांच्या आगमनावेळी कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.महाराष्ट्र राज्याचे लोकप्रिय उपमुख्यमंत्री मा. ना. एकनाथजी शिंदे साहेब आणि खासदार डॉ. श्रीकांत शिंदे साहेब यांच्या नेतृत्वाखाली तसेच युवासेना कार्याध्यक्ष पुर्वेशजी सरनाईक यांच्या मार्गदर्शनाखाली युवासेना मराठवाडा निरीक्षक बाजीराव



चव्हाण यांच्या वतीने शिवसेना बीड लोकसभा संपर्कप्रमुख मनोज शिंदे साहेब यांचे हृदयपूर्वक स्वागत करण्यात आले. या प्रसंगी शिवसेना व युवासेनेचे अनेक पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी शिवसेना मराठवाडा सचिव अशोकजी पटवर्धन, शिवसेना जिल्हाप्रमुख बीड सचिन मुळक, शिवसेना जिल्हाप्रमुख बीड चंद्रकांत नवले, युवासेना मराठवाडा निरीक्षक अविनाश जाधव, युवासेना जिल्हाप्रमुख आष्टी सुमित कोळपे, युवासेना लोकसभा अध्यक्ष पाटोदा प्रतीक भोसले, युवासेना उपजिल्हा प्रमुख केज विधानसभा काशिनाथ जाधव, युवासेना उपजिल्हा प्रमुख गेवराई विधानसभा निलेश पवार, युवासेना उपजिल्हा प्रमुख आष्टी, पाटोदा, शिरूर विधानसभा गणेश मकाळ, युवासेना लोकसभा प्रमुख आष्टी शिवराज उगले, तसेच वैद्यकीय मदत कक्षाचे जिल्हाप्रमुख महादेव मातकर उपस्थित होते. यावेळी मोठ्या संख्येने युवासैनिक व शिवसैनिक उपस्थित राहून कार्यक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या भेटीदरम्यान संघटनात्मक बळकटी, आगामी उपक्रम व पक्षविस्तार यावर चर्चा करण्यात आली.

# ॲसिड हल्ला पीडितेस शासन सर्वतोपरी मदत करणार – महिला व बालविकास मंत्री कु. आदिती तटकरे

**शिर्डी । प्रतिनिधी**

संगमनेर तालुक्यातील वडगावपान येथील सिड हल्ल्यातील पीडित मुलीची महिला व बालविकास मंत्री कु. आदिती तटकरे यांनी रविवारी लोणी येथील प्रवरा रुग्णालयात जाऊन भेट घेतली. या अत्यंत निंदनीय घटनेतील पीडित मुलीच्या पाठीशी शासन खंबीरपणे उभे आहे आणि तिच्या पुढील उपचारांचा संपूर्ण खर्च शासन करेल, अशी ग्वाही कु. तटकरे यांनी दिली. रुग्णालयात उपचार घेत असलेल्या या मुलीची प्रकृती सध्या स्थिर आहे. मात्र, तिचे वय लहान असून त्वचा संवेदनशील असल्याने तिला आणखी काही दिवस उपचारांची तसेच एका शस्त्रक्रियेची आवश्यकता आहे.



डॉक्टर व प्रशासन तिची पूर्ण काळजी घेत आहेत. मुलीचे विशेष समुपदेशकाकडून समुपदेशन करण्यात आले असून, स्थानिक डॉक्टरांच्या मदतीने हे समुपदेशन पुढेही प्रभावीपणे सुरू ठेवण्याबाबत चर्चा झाली आहे. पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे–पाटील यांनी सांगितल्याप्रमाणे, या उपचारांचा कोणताही आर्थिक भार पीडितेच्या कुटुंबावर पडू दिला जाणार नाही. पीडितेस महिला व बालविकास विभागाच्या 'मनोधैर्य' योजनेअंतर्गत एक लाख रुपयांचे आर्थिक साहाय्य तात्काळ देण्यात येईल. यासोबतच, न्याय विभागाच्या 'व्हिक्टिम कॉम्पेन्सेशन स्कीम २०२२' अंतर्गत तिच्या कुटुंबाला तातडीची मदत म्हणून ३ लाख रुपये आधीच देण्यात आले आहेत. घटनेच्या दिवसापासूनच आपण पोलीस अधीक्षकांच्या संपर्कात असल्याचे सांगून मंत्री तटकरे म्हणाल्या, स्थानिक आमदारांनीही हा मुद्दा सभागृहात मांडला होता. सध्या आरोपीचा शोध घेण्यासाठी पोलिसांचा तपास वेगाने सुरू असून, विविध यंत्रणांची मदत घेतली जात आहे. कुटुंबाकडे काही अतिरिक्त माहिती असल्यास ती पोलिसांना द्यावी, तसेच त्यांच्या काही अपेक्षा असल्यास त्या सांगाव्यात, असे आवाहनही त्यांनी केले.

# परभणीत विभागीय महसूल क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेचे पालकमंत्री मेघना बोर्डीकर यांच्या हस्ते उदघाटन

**परभणी । प्रतिनिधी**

छत्रपती संभाजीनगर विभागीय महसूल क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा–२०२६ चे पालकमंत्री मेघना साकोरे–बोर्डीकर यांच्या हस्ते थाटात उदघाटन झाले. यंदा परभणी जिल्हयाला या स्पर्धेचे यजमानपद मिळाल्याबद्दल समाधान व्यक्त करत पालकमंत्री यांनी खेळाडुंना शुभेच्छा दिल्या. दैनंदिन कामाचा ताण–तणाव हलका होण्यासाठी खेळ आवश्यकच असून मानसिक आरोग्य आणि फिटनेससाठी प्रत्येकाने खेळ अवश्य खेळावा, असे आवाहन त्यांनी केले.

वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाच्या अश्वमेध मैदानावर तीन दिवस चालणाऱ्या या सोहळयात विविध क्रीडा स्पर्धा होणार आहेत. भव्य स्वरुपात व उत्साहपूर्ण वातावरणात या स्पर्धेचे उदघाटन झाले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून महापौर सय्यद इकबाल सय्यद खाजा, जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा लता विजयकुमार वाकळे, विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर, वसंतराव नाईक मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. इंद्र मणी, जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण,



जालन्याच्या जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, हिंगोलीचे जिल्हाधिकारी राहुल गुप्ता, धाराशिवचे जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार, बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, परभणीचे पोलीस अधीक्षक रविंद्रसिंह परदेशी, विभागीय आयुक्त कार्यालयाचे सह आयुक्त डॉ. अनंत गव्हाणे, सह आयुक्त पुनर्वसन राजेश काटकर, अपर आयुक्त (महसूल) रिता मेत्रेवार, निवासी उपजिल्हाधिकारी अनुराधा ढालकरी, उपविभागीय अधिकारी उदयसिंह भोसले यांच्यासह विभागातील सर्व जिल्हयांचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. प्रारंभी पालकमंत्री श्रीमती बोर्डीकर यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने स्पर्धेचे उदघाटन पार पडले. यानंतर ध्वजारोहण करण्यात आले. मशालीने क्रीडा ज्योत पेटविण्यात आली. विविध जिल्हयातून आलेल्या स्पर्धांकांनी अतिशय शिस्तबध्द पध्दतीने मान्यवरांना मानवंदना दिली. काही जिल्हयाच्या कर्मचाऱ्यांनी पारंपारिक वेशभुषेत मानवंदना दिली. सर्व स्पर्धकांना क्रीडा शपथ देण्यात आली. यावेळी मान्यवरांच्या हस्ते जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी यांनी तयार केलेल्या स्मरणिकेचे विमोचन करण्यात आले.

पालकमंत्री श्रीमती बोर्डीकर म्हणाल्या की, सर्वसामान्यांच्या हितासाठी अधिकारी–कर्मचारी वर्षभर काम करीतच असतात. मात्र, काम करीत असताना शारिरिक व मानसिक आरोग्य चांगले राहण्यासाठी खेळ किंवा छंद जोपासणे आवश्यक आहे. अशा स्पर्धांमधून कर्मचाऱ्यांना एक नवी ऊर्जा मिळते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यात अनेक लोकोपयोगी उपक्रम राबविले जातात. शंभर आणि दीडशे दिवसांच्या उपक्रमात विभागातील अनेक कार्यालयांनी उत्कृष्ट कामगिरी केली आहे. अधिकारी, कर्मचारी यांच्या सकारात्मकतेमुळेच असे उपक्रम यशस्वी होतात, ही अतिशय समाधानाची बाब असल्याचे पालकमंत्री यांनी यावेळी सांगितले. विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर म्हणाले की, दरवर्षी भरविण्यात येणाऱ्या या स्पर्धा एक कौटुंबिक सोहळाच आहे. राज्यात छत्रपती संभाजीनगर हा सर्वात मोठा विभाग आहे. सर्वसामान्यांच्या हितासाठी या विभागातील सर्वच अधिकारी , कर्मचारी सक्रीयतेने काम करतात. शासनाच्या अनेक योजना, उपक्रम प्रभावीपणे विभागात राबविण्यात येतात. ही निश्चितपणे समाधानाची बाब आहे. कर्मचाऱ्यांना या कामातून थोडा रिलिफ मिळावा म्हणून स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते.

# महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाच्या थेट कर्ज योजनेसाठी ८ एप्रिल रोजी लॉटरी

**जालना । प्रतिनिधी**

महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादित, जिल्हा कार्यालय जालना यांच्या वतीने सन २०२५–२६ या आर्थिक वर्षासाठी राबविण्यात येत असलेल्या थेट कर्ज योजनेच्या लाभार्थ्यांची निवड आता लॉटरी पद्धतीने (चिठ्ठी टाकून) केली जाणार आहे. ही निवड प्रक्रिया बुधवार दि. ८ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ११ वाजता भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, जिल्हाधिकारी कार्यालयासमोर, जालना येथे पार पडणार आहे.

या आर्थिक वर्षासाठी जालना जिल्ह्याला एकूण २४ लाभार्थ्यांचे उद्दिष्ट प्राप्त झाले होते. या योजनेसाठी महामंडळाकडे एकूण १६६ उमेदवारांनी ऑनलाइन पद्धतीने अर्ज केले होते. अर्जांच्या छाननीनंतर त्यापैकी ११९ अर्जदार पात्र ठरले असून, ४७ अर्ज अपात्र ठरवण्यात आले आहेत. निवासी उपजिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा लाभार्थी निवड समिती यांच्या अध्यक्षतेखाली ही लॉटरी प्रक्रिया राबविली जाईल. निवड प्रक्रियेत पूर्णतः पारदर्शकता राहावी यासाठी ही विशेष बैठक आयोजित करण्यात आली आहे. महामंडळाच्या वतीने सर्व पात्र अर्जदारांना या निवड प्रक्रियेसाठी उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या प्रक्रियेद्वारे पात्र ११९ उमेदवारांमधून चिठ्ठी टाकून अंतिम २४ लाभार्थ्यांची निवड केली जाणार आहे. असे जिल्हा व्यवस्थापक, जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

# महाराष्ट्र शासनाच्या कृतीशील धोरणामुळे क्रीडापटूंना स्थैर्य आणि सन्मान: मंत्री चंद्रकांतदादा पाटील

### ३७२ क्रीडापटूंचे शासकीय सेवेत थेट समावेशन

**सांगली । प्रतिनिधी**

क्रीडाक्षेत्र हा करिअरचा सक्षम पर्याय म्हणून सामोरा येत असून महाराष्ट्र शासनाच्या सकारात्मक व कृतिशील धोरणामुळे येथील राज्यातील क्रीडापटूंना स्थैर्य आणि सन्मान प्राप्त होत आहे. विविध क्रीडाप्रकारांत उत्तुंग कामगिरी करणाऱ्या ३७२ खेळाडूंना महाराष्ट्र शासनाच्या सेवेमध्ये विनापरीक्षा थेट सामावून घेण्यात आले आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्राचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री तथा सांगली जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी आज येथे केले. भारतीय विद्यापीठे महासंघ (ए.आय.यू.)



आणि शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित अखिल भारतीय आंतर विद्यापीठ कनोईंग व कयाकिंग (पुरुष व महिला) स्पर्धांचे उद्धाटन मंत्री श्री. पाटील यांच्या हस्ते आज सकाळी येथील कै. वसंत दादा पाटील स्मृती स्मारक, कृष्णा नदीवरील रॉयल बोट क्लब येथे झाले. त्यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून आमदार धनंजय उर्फ सुधीर गाडगीळ, माजी आमदार दिनकर पाटील, प्रभारी प्र–कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, कलापि उद्योगाचे योगेश लोहकरे, अधिसभा सदस्य संजय परमणे, काव्यश्री नलवडे आदी उपस्थित होते. मंत्री चंद्रकांतदादा पाटील म्हणाले, क्रीडा क्षेत्रात करिअर घडविणाऱ्या तरुणांसाठी महाराष्ट्र शासनाने मोठ्या प्रमाणावर प्रोत्साहनपर धोरणे लागू केली आहेत. आंतरराष्ट्रीय स्तरावर पदक मिळविणाऱ्या खेळाडूंना थेट वर्ग एकची शासकीय नोकरी, राष्ट्रीय स्तरावर सुवर्णपदक विजेत्यांना वर्ग दोन, तर राज्य स्तरावरील विजेत्यांना वर्ग तीन व चारची पदे देण्याचा निर्णय शासनाने घेतला. याशिवाय, क्रीडापटूंना आर्थिक बळ देण्यासाठी आकर्षक रोख पारितोषिकांची तरतूद करण्यात आली आहे. आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सुवर्णपदक विजेत्यांना रुपये २ कोटी, राष्ट्रीय स्तरावर रूपये एक कोटी आणि राज्य स्तरावर रुपये ५० लाख इतकी बक्षिसे दिली जात आहेत, असे त्यांनी नमूद केले.

## जाहीर प्रगटन

**तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, कार्यालय धारुर मध्यवर्ती प्रशासकिय ईमारत धारुर ता. धारुर जि. बीड**

**क्रमाक २०२६ / संकीर्ण / जन्म–मृत्यु/कावी–**
**दिनांक ०१/०४/२०२६**

प्रति,
पोलीस निरीक्षक,
पोलीस स्टे. धारूर

विषय:– अर्जदाराच्या स्थानिक रहिवासाचा स्थानिक चौकशी / पंचनामा करुन वस्तुस्थितीदर्शक अहवाल या कार्यालयास सादर करणे बाबत.

संदर्भ:– १.शासन निर्णय क्रमांक जमृनों २५२५/ ई. ऑ. ९९११८१/ प्र.क्र. २२/कु.क./दिनांक– १२ मार्च २०२५

२. अर्जदार, **श्रीम. खेलोजी सरिता प्रभाकर रा. धारुर ता. धारुर जि. बीड यांचा अर्ज दि. ३०.०३.२०२६**

उपरोक्त संदर्भीय विषयांच्या अनुषंगाने अर्जदार, श्रीम. खेलोजी सरिता प्रभाकर ता. धारुर जि. बीड यांचा जन्म दिनांक १६.०२.१९७३ रोजी मौजे धारुर ता. धारुर जि. बीड येथे झाला असुन अर्जदारांनी सदरहु जन्माच्या संबंधित निबंधक न. प. धारुर जन्म / मृत्यु नोंदणी रजिस्टरमध्ये नोंद घेणे बाबत आदेश मिळावे असे संदर्भ क्रं. ०२ अन्वये अर्ज या कार्यालयास सादर केलेला आहे.

त्याअनुषंगाने आपणास सुचित करण्यात येते की, आपण प्रत्यक्ष जायमोक्यावर जाऊन अर्जदाराच्या स्थानिक जन्माचा ठिकाणाचा व रहिवासाचा तपास करुन चौकशी अहवाल स्वयंस्पष्ट अभिप्रायसह या कार्यालयास सादर करण्यात यावा जेणेकरुन प्रकरणात पुढील कार्यवाही अनुसरणे सोईचे होईल. या कामी हयगय अथवा विलंब हाणार नाही याबाबतची दक्षता घेण्यात यावी.

**आदेशावरून**
**(स्वाक्षरीत)**
**तहसीलदार धारुर**

शिक्का

दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● सोमवार दि. ०६ एप्रिल २०२६ ●

# बीडकरांना प्रधानमंत्री आवास योजनेतून ७२९ घरकुलांना मंजुरी

## भारतीय जनता पार्टीच्या प्रयत्नाला यश: मा. श्री. नवनाथ शिराळे पाटील

**बीड । प्रतिनिधी**

सध्या भारतामध्ये देव देश धर्म यासाठी सातत्याने चालणारे सरकार देशातील नागरिकांना लाभले आहे मा श्री लोकप्रिय प्रधानमंत्री नरेंद्रजी मोदी साहेब हे देव देश धर्म या या उत्कृष्ट कार्यासाठी ते सातत्याने व्यस्त असतात व सर्व भारतातील तमाम सर्वसामान्य गोरगरीब नागरिकांपर्यंत पर्यंत शासनाच्या विविध विकासात्मक योजना कशा पोहोचतील याच्यावर त्यांचा मोठा भर असतो याच अनुषंगाने महाराष्ट्र राज्यामध्ये देखील देव देश धर्म यासाठी सातत्याने कार्य करणारे महाराष्ट्राचे कर्तव्यदक्ष या लोकप्रिय मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब उर्फ सर्वांचे देवा भाऊ यांचे सरकार कार्यरत आहे या सरकारमध्ये या उपमुख्यमंत्री एकनाथ जी शिंदे साहेब व दुसऱ्या मा उपमुख्यमंत्री सुनेत्रा ताई पवार



व महाराष्ट्र राज्याच्या पशुसंवर्धन कॅबिनेट मंत्री पंकजाताई मुंडे यांच्याकडे भारतीय जनता पार्टीच्या बीड जिल्ह्याच्या वतीने बीड शहरातील नागरिकांनी ऑनलाईन रमाई आवास योजनेसाठी केलेल्या घरकुल फॉर्म ला मंजुरी चांगल्या प्रकारे मिळावी घरकुलांना मंजुरी घ्यावी या साठी प्रस्ताव बीड जिल्हा भारतीय जनता पार्टीच्या वतीने व पाठवण्यात आला होता या प्रस्तावावर स्वीकृत नगरसेवक गोविंद शिराळे पाटील यांची देखील सिग्नेचर आहे या घरकुल आवास योजनेच्या प्रस्तावावर राज्य सरकारने प्रयत्न करून केंद्र सरकारकडून मंजुरी मिळून बीड शहराला खूप मोठी घरकुलाची मंजुरी देऊन बीडकरांचे मन जिंकले आहेत

बीड नगर परिषद अंतर्गत प्रधानमंत्री आवास योजना शहरी २.० अंतर्गत ७२९ घरकुलांना मंजुरी मिळाली आहे. ज्या लाभार्थ्यांना घरकुल मंजुर झाले आहे अशा लाभार्थ्यांनी या योजनेचा लाभ घेण्याकरीता मालकीच्या जागेवर बांधकाम नकाशा, लोकेशन प्लान व बांधकाम परवानगी घेऊन त्वरीत बांधकाम सुरु करावे असे आवाहन भारतीय जनता पार्टीचे नेते नवनाथ अण्णा शिराळे पाटील व बीड नगर स्वीकृत नगरसेवक एडवोकेट गोविंद शिराळे पाटील यांनी प्रसिद्धी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकाच्या माध्यमातून केले आहे.

सर्वांसाठी घरे अन्न वस्त्र हे अत्यंत आवश्यक आहे यासाठी भारताचे लोकप्रिय प्रधानमंत्री नरेंद्र भाई मोदी साहेब हे सातत्याने लोकांपर्यंत योजना कशा उपलब्ध होतील त्याच्यासाठी ते सातत्याने प्रयत्न करतात व स्वतः या संकल्पनेवर आधारीत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी बीड शहरातील नागरीकांनी

प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत ऑनलाईन अर्ज सादर केले होते. सदर योजने अंतर्गत बीड शहरातील ७२९ लाभार्थ्यांचे घरकुल मंजुर झाले आहे. म्हणून प्रधानमंत्री महोदय व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब तसेच भारतीय जनता पार्टीच्या राष्ट्रीय नेत्या तथा पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांचे सर्व बीड जिल्ह्यातून त्यांच्या उत्कृष्ट कर्तव्याच्या बाबतीत नागरिकांमधून समाधान व्यक्त होत आहे व बीड शहरातील ज्यांना घरकुल मंजूर झाले आहे अशा मंजुर लाभार्थ्यांची यादी नगर परिषद कार्यालय या ठिकाणी प्रसिद्ध करण्यात आलेले आहे तरी बीड शहरातील सर्व नागरिकांनी या घरकुल योजनेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा काही अडचण असल्यास डायरेक्ट आमच्याशी संपर्क करावा असे आव्हान देखील या प्रसिद्ध पत्रकाच्या माध्यमातून भारतीय जनता पार्टीचे नेते तथा बीड नगर परिषदेचे माजी सभापती नवनाथ अण्णा शिराळे पाटील तसेच बीड नगर परिषदेचे स्वीकृत नगरसेवक एडवोकेट गोविंद शिरोळे पाटील यांनी केले आहे

## बीड बसस्थानकातील गळतीबाबत एसटी महामंडळाचा खुलासा

**बीड । प्रतिनिधी**

दिनांक २ एप्रिल २०२६ रोजी बीड बसस्थानक परिसरातील गळतीसंदर्भात काही प्रसारमाध्यमे व सामाजिक माध्यमांवर व्हिडिओ प्रसारित झाल्यानंतर महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (एसटी), बीड विभागाने याबाबत अधिकृत खुलासा केला आहे. महामंडळाने दिलेल्या माहितीनुसार, अवकाळी पावसामुळे बसस्थानकाच्या प्रवेशद्वारावरील पोर्च (कॅनोपी) भागात मर्यादित स्वरूपाची पाण्याची गळती झाली होती. संबंधित भागात बसविण्यात आलेली गटर (नळी) पाला- पाचोळा व धूळ साचल्यामुळे तात्पुरती बंद झाली होती. त्यामुळे पाण्याचा निचरा न




झाल्याने पाणी एसीपी पॅनलच्या बॉक्समध्ये साचून गळती निर्माण झाली. घटनेची माहिती मिळताच प्रशासनाने तत्काळ गटर स्वच्छ करून पाण्याचा निचरा सुरळीत होईल अशी कायमस्वरूपी व्यवस्था केल्याचे सांगण्यात आले. सध्या त्या ठिकाणी कोणतीही गळती नसल्याचा दावा महामंडळाने केला आहे. तसेच, बसस्थानकाचे बांधकाम मंजूर निविदेनुसार व तांत्रिक मानकांनुसार करण्यात आले. असून काम अंतिम टप्प्यात असल्याची माहिती देण्यात आली. प्रवासी प्रतीक्षालय, कार्यालयीन विभाग व इतर अंतर्गत भागांमध्ये कोणतीही गळती आढळलेली नसल्याचेही स्पष्ट करण्यात आले.

## बीड शहरातील मतदारानी आपले नाव यादी मध्ये मॅपिंग शिबिराच्या माध्यमातून लावून घ्यावे : नगरसेवक अ‍ॅड.गोविंद शिराळे



**बीड । प्रतिनिधी**

निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार विशेष संक्षिप्त पुनरिक्षण अंतर्गत मतदार यादी मॅपिंग प्रक्रियेसाठी बीड तालुक्यात ४ व ५ एप्रिल २०२६ रोजी (शनिवार/रविवार) विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरांमध्ये मतदार यादीतील नावांची मॅपिंग केली जाणार आहे. याच पार्श्वभूमीवर बीड नगर परिषदेचे नगरसेवकड.गोविंद शिराळे पाटील यांनी नागरिकांना या शिबिरांचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे. ते म्हणाले की, मतदार यादीतील अचूकता सुनिश्चित करणे अत्यंत महत्त्वाचे असून प्रत्येक पात्र नागरिकाने आपल्या प्रभागातील मतदान केंद्रावर जाऊन नावाची खातरजमा करून बीड तालुक्यातील चार व पाच एप्रिल रोजी एस आय आर आवश्यक त्या दुरुस्त करून घ्याव्यात यामुळे भविष्यातील निवडणुकीमध्ये कोणत्याही अडचणीचा सामना करावा लागणार नाही तसेच बीड तालुक्यातील सर्व नागरिकांनी चार व पाच एप्रिल रोजी शनिवार रविवार सकाळी नऊ ४५ ते सायंकाळी सहा १५ पर्यंत या वेळेत आयोजित शिबिरात सहभागी होऊन मतदार नोंदणी प्रक्रिया पूर्ण करावी असेही नगरसेवकड .गोविंद शिराळे पाटील यांनी दिलेल्या प्रसिद्धीपत्रकाच्या माध्यमातून नमूद केले आहे नागरिकांनी आपले मतदान ओळखपत्र सोबत आणावेत आणि या उपक्रमात सहकार्य करावे असे आवाहन देखील नगरसेवकड.गोविंद शिराळे पाटील यांनी बीड तालुक्यातील सर्व तमाम मतदार बंधू आणि भगिनी यांना आवाहन केले आहे .



*बीड : मंथन राज्यस्तरीय सामान्यज्ञान परीक्षा २०२६ मध्ये कु. वेदिका देविदास देशमाने हिने १८० गुण मिळवून उल्लेखनीय व दैदिप्यमान यश संपादन केले. तिच्या या उज्वल यशाबद्दल संस्थेचे सचिव प्रा. जे. पी. शेळके साहेब, मुख्याध्यापक आर. टी. राऊत, जी. डी. कदम व एम. एस. सोनवणे यांनी पुष्पगुच्छ देऊन तिचे मनःपूर्वक अभिनंदन केले.*

## आरटीई प्रवेशांसाठी आज सोडत तसेच प्रतीक्षा यादी होणार जाहीर

## आरटीई प्रवेशासाठी 6 हजार 322 अर्ज दाखल : मनोज जाधव

**बीड । प्रतिनिधी**

शिक्षण हक्क कायद्याअंतर्गत (आरटीई) खासगी शाळांतील २५ टक्के राखीव जागांवरील प्रवेशासाठी ०६ एप्रिल रोजी सोडत काढण्यात येणार आहे. सोडतीमध्ये प्रवेशासाठी पात्र ठरणाऱ्या विद्यार्थ्यांची यादी तसेच प्रतीक्षा यादी जाहीर करण्यात येणार असल्याची माहिती शिवसंग्रामचे युवा नेते तथा आरटीई कार्यकर्ते मनोज जाधव यांनी दिली आहे.

सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी आरटीई २५ टक्के ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेची सोडत सोमवारी (६ एप्रिल) महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद येथे शिक्षण आयुक्तांच्या हस्ते काढण्यात येणार आहे. सोडत काढल्यानंतर प्रवेशपात्र विद्यार्थ्यांची शाळानिहाय यादी जाहीर केली जाणार आहे.

यंदा आरटीई प्रवेशांसाठी जिल्ह्यात २१४ शाळांमध्ये २ हजार ४२२ जागा उपलब्ध आहेत.



अर्ज भरण्यासाठी ३१ मार्चपर्यंत दिलेल्या मुदतीमध्ये ८ हजार ८४८ अर्ज दाखल झाले होते. यापैकी २ हजार ५२६ अर्ज अनकन्फर्म असल्यामुळे ६ हजार ३२२ अर्ज पात्र ठरले आहेत. आता या पात्र विद्यार्थ्यांच्या प्रवेशाचे भवितव्य सोमवारी होणाऱ्या लॉटरी पद्धतीने ठरणार आहे.

### ● गैरप्रकारांबाबत तक्रार करण्याचे आवाहन

**'आरटीई' प्रवेश प्रक्रियेत कोणत्याही प्रकारचा मानवी हस्तक्षेप केला जात नाही. पालकांना पाल्यांच्या प्रवेशासंदर्भात कोणत्याही प्रकारची प्रलोभने दिली जात असल्यास अशा प्रलोभनांना बळी पडू नये. प्रवेशाबाबत कोणतेही गैरप्रकार निदर्शनास आल्यास जिल्ह्याचे प्राथमिक शिक्षणाधिकारी, विभागीय शिक्षण उपसंचालक, प्राथमिक शिक्षण संचालनालय (वशारिह२सारळश्र.लो) तसेच शिक्षण आयुक्त (शर्वीलोषषळलशसारळश्र. लो) यांच्याकडे समक्ष किंवा ई-मेलद्वारे पुराव्यासह तक्रार नोंदवावी, असे आवाहन करण्यात आले आहे. प्रवेश प्रक्रियेत गैरप्रकार आढळल्यास फौजदारी कारवाई करण्याचा इशाराही देण्यात आला आहे.**

### तालुका निहाय आकडेवारी

| तालुके | (शाळा) | (प्रवेशाच्या जागा) | (दाखल अर्ज) |
|---|---|---|---|
| अंबाजोगाई | ३४ | ३०० | १०३२ |
| आष्टी | १० | १०२ | ९३ |
| बीड | १७ | २३१ | १५५१ |
| धारूर | ०८ | १३१ | २४४ |
| गेवराई | ३६ | ३८७ | ९९३ |
| केज | २२ | २१६ | ३८७ |
| माजलगांव | २७ | २६८ | ७४९ |
| परळी | २३ | २९४ | ८०७ |
| पाटोदा | ०३ | ३३ | १०२ |
| शिरूर | ०७ | ७७ | १९१ |
| बीड शहर | २० | ३२० | ११३ |
| वडवणी | ०७ | ६३ | ६० |
| एकूण | २१४ | २४२२ | ६३२२ |

## थोडक्यात...

### महापुरुष सामान्य ज्ञान स्पर्धेला प्रतिसाद

**जयभीम महोत्सवाच्या संयोजन समितीचे सुयोग्य नियोजन**



**बीड । प्रतिनिधी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त सार्वजनिक जयंती उत्सव समिती, बीड यांच्या वतीने (दि. ५) एप्रिल ते १४ एप्रिल या कालावधीत 'जयभीम महोत्सव' उत्साहात साजरा करण्यात येत आहे. या महोत्सवाच्या निमित्ताने शहरातील तुलसी संगणक महाविद्यालय येथे रविवारी (दि. ५) एप्रिल रोजी आयोजित महापुरुष सामान्य ज्ञान स्पर्धेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या स्पर्धेच्या अध्यक्षस्थानी उप शिक्षणाधिकारी नानभाऊ हजारे होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रविण तरकसे, रेखा निर्मळ, कल्याण भांडारे उपस्थित होते. सार्वजनिक जयंती उत्सव समितीकडून तालुका स्तरावर आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धेत तब्बल ७८० विद्यार्थ्यांनी चाळणी परीक्षेत सहभाग नोंदविला होता. त्यापैकी पात्र ठरलेल्या ११० विद्यार्थ्यांची अंतिम फेरी रविवारी पार पडली. अंतिम स्पर्धेत कार्तिकी अनाप हिने प्रथम क्रमांक पटकावला. द्वितीय क्रमांक भार्गवी तुपे व वैष्णवी थोरात यांनी मिळविला, तर तृतीय क्रमांक स्वरा भांडेकर आणि यश जावळे यांनी मिळविला. स्पर्धेचे परीक्षण प्रा.प्रशांत मळेकर, प्रा. सुनिल मोरे,प्रा. अनिल जरे, प्रा.अशोक सवासे,आप्पासाहेब कांबळे, जितेश उगलमुगले यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक स्पर्धा समिती प्रमुख प्रा. शशिकांत जावळे यांनी केले, तर सूत्रसंचालन महादेव इनकर यांनी तर आभार प्रा.नारायण घोलप यांनी केले. महापुरुष सामान्य ज्ञान स्पर्धा यशस्वीपणे पार पाडण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीचे प्रमुख मनोज वाघमारे, सुमेध जोगदंड, अशोक ठोकळ, प्रणित सरवदे, ड राजेश शिंदे, किरण निसर्गंध, प्रा. प्रकाश ढोकणे, पी.डी. जावळे ,निलेश तरकसे , चंद्रकांत साळवे, प्रा. प्रकाश ढोकणे आदींनी मोलाचे योगदान दिले. दरम्यान यावेळी पूज्य भदंत विपश्यनाचार्य विनयरक्षित महाथेरो व पूज्य भिक्कू धम्मशील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच उपशिक्षणाधिकारी नानाभाऊ हजारे यांनी पुढील वर्षीपासून बक्षीस म्हणून २५ हजार रुपये व प्रथम तीन गटामधून येणारे ९ विद्यार्थ्यांना ऐतिहासिक स्थळाची भेट सहल देण्याचे त्यांनी जाहीर केले. जयभीम महोत्सवात साजऱ्या होणाऱ्या सर्व कार्यक्रमांना उपस्थित राहून आनंद घ्यावा, असे आवाहन डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीने केले आहे.

### अस्मिता फंक्शन हॉलचे उद्घाटन संपन्न



**बीड । प्रतिनिधी**

शहराच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि कौटुंबिक कार्यक्रमांना आधुनिक व सुसज्ज सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने उभारण्यात आलेल्या अस्मिता फंक्शन हॉल या भव्य वास्तूचे उद्घाटन व लोकार्पण सोहळा आज अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या हस्ते फित कापून या हॉलचे उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. संभाजी विठ्ठलराव शिंदे होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. योगेश क्षीरसागर यांची उपस्थिती लाभली. या सोहळ्यास शहर व जिल्ह्यातील विविध क्षेत्रांतील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते, शिक्षक, राजकीय पदाधिकारी, उद्योजक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने करण्यात आली. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते फित कापून व शुभारंभ करून हॉल सर्वांसाठी खुला करण्यात आला. यावेळी उपस्थित नागरिकांनी टाळ्यांच्या कडकडाटात या उपक्रमाचे स्वागत केले. कार्यक्रमा दरम्यान बोलताना तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी सांगितले की, शहरात अशा आधुनिक आणि सुसज्ज हॉलची गरज होती. अशा प्रकारच्या सुविधा उपलब्ध झाल्यामुळे नागरिकांना त्यांच्या विविध समारंभांसाठी सोयीस्कर पर्याय उपलब्ध होतो. तसेच अशा उपक्रमांमुळे शहराच्या विकासाला चालना मिळते, असे त्यांनी नमूद केले. आजपासून अस्मिता फंक्शन हॉल हा हॉल सर्वसामान्य नागरिकांसाठी सेवेत दाखल करण्यात आला असून, शहरातील सामाजिक व सांस्कृतिक जीवनात तो एक महत्त्वाचा टप्पा ठरेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. मंचावर ज्येष्ठ शिक्षक नेते उत्तमराव पवार, प्रा. प्रदीप रोडे, उपनगराध्यक्ष विनोदभैय्या मुळुक, आमेरभैय्या सिद्दीकी, नगरसेवक शुभम धूत, शुभम कातांगळे, मंगेश धोंगडे, रामदास सरवदे, विधीज्ञ नागेश तांबरे, संपादक साहस आदोडे, माजी पोलीस निरीक्षक तान्हाजी शिनगारे, माजी सहायक निबंधक विधीज्ञ हनुमंत कांबळे, प्रा. डॉ. सचिन तांदळे, माजी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सुदाम मोगले, अरुणाताई आठवले, प्रा. राम गायकवाड, विधीज्ञ मनोज वाघमारे, सुमेध जोगदंड, माजी पोलीस अधिकारी अशोक ठोकळ, कॅप्टन राजाभाऊ आठवले, भारतीय डाक अधिकारी अमरसिंग ढाका, बाबाजी वानखेडे, डॉ. संध्या घुगे, डॉ. तेजस्विनी घुगे, अभिनेत्री सोनाली शहाणे, सुभाष लोणके, बाळासाहेब पौळ, एस.एम. जोगदंड, गुलाबराव भोले, प्रा. दिपक जमधाडे, प्रा. डॉ. संजय कांबळे, इंजी. वचिष्ट तावरे, भारत मगर, प्रा. बाळासाहेब जाधव, माजी सहायक पोलीस निरीक्षक भास्कर कांबळे, बाबुराव गालफाडे, राजेंद्र गालफाडे, कर सल्लागार विधीज्ञ गणेश शिंदे, संभाजी ब्रिगेडचे शहराध्यक्ष जीवन घोलप, प्रा. डॉ. खान, प्रा. डॉ. इमाद अख्तर, प्रा. डॉ. शेख शकील, सौ. सुनीता सानप, अनिता खंडागळे, डॉ. शशिकांत उम्रजकर, सुग्रीव तावरे, महादेव नागरगोजे, धर्मराज मुजमुले